पुढारी पान क्र.३ दि. 15/04/2023

# रॅलीदरम्यान शॉक लागून दोघांचा जागीच मृत्यू

## विरारमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूकीत दुर्घटना, चौघे गंभीर

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

विरारच्या कारगिलनगरमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मिरवणुकीदरम्यान विजेचा झटका लागून २ जणांचा जागीच मृत्यू झाला तर ३ जण गंभीर जखमी झाले. गुरूवारी रात्री साडेदहाच्या सुमारासही दुर्घटना घडली. याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

विरारच्या कारगिलनगर येथील बौद्धजन पंचायत समितीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली होती. रात्री ९ वाजता निघालेली ही मिरवणूक साडेदहा वाजता संपली. कारगिल चौकातून मिरवणूक संपवून कार्यकर्ते घरी परतत होते. त्यावेळी मिरवणूक वाहनावर (ट्रॉली) ६ जण उभे होते. त्यावेळी वाहनावरील लोखंडी रॉडजवळील रोहित्राला लागला. त्या वीजप्रवाहामुळे वाहनावरील ६ जण होरपळले. त्यातील रुपेश सुर्वे (३०) आणि सुमित सुत (२३) या दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. तर ४ जण जखमी झाले. त्यातील उमेश कनोजिया (१८), राहुल जगताप (१८), सत्यनारायण (२३) ३ गंभीर जखमींना मुंबईच्या कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अस्मित कांबळे (३२) या तरुणाची प्रकृती स्थिर आहे अशी माहिती वसई नायब तहसीलदार सी.के. पवार यांनी दैनिक पुढारीशी बोलताना दिली आहे.

घटनेची खबर मिळताच स्थानिक नगरसेवक प्रशांत राऊत, सामाजिक कार्यकर्ते, मनीष राऊत, गीता जाधव, झहीर शेख, उदय जाधव, अजित खांबे, भीमसैनिक, डॉ.बाबासाहेब आंबेडकरप्रेमींनी नालासोपाऱ्याच्या तुळींज रुग्णालयात गर्दी केली होती. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस उपायुक्त सुहास बावचे, सहाय्यक पोलीस आयुक्त रामचंद्र देशमुख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, नायब तहसीलदार सीके पवार यांनी घटनो स्थळाला भेट दिली. या दुर्दैवी घटनेमुळे एकच हळहळ व्यक्त होत आहे.

### विजेच्या तारांना स्पर्श होणार नाही याची काळजी घ्या...

मिरवणूक संपवून परताना ट्रॉलीवरील लोखंडी रॉडचा ट्रान्सफॉर्मर धक्का लागल्याने विजेचा झटका लागून ही दुर्घटना घडली आहे. मिरवणुका काढताना नेहमी आपण झेंडा कोणत्या ट्रान्स्फॉर्मरला लागत नाही ना किंवा कोणत्याही विजेच्या तारांना स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन विरारचे सहाय्यक पोलीस आयुक्त रामचंद्र देशमुख यांनी केले आहे. या जयंती रॅलीत नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या दुर्घटनेमुळे शहरावर शोककळा पसरली आहे.

# नालासोपारात नायजेरियनचा कहर

- अंमली पदार्थांची विक्री वाढली
- ३२ लाखाचे एमडी जप्त

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नालासोपारा परिसरात १६० ग्रॅम वजनाचे ३२ लाख रुपयाचा मॅफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ खरेदी-विक्री करण्यासाठी आलेल्या परकीय नायजेरीयन नागरिकाला अंमली पदार्थ विरोधी कक्षाने कारवाई करून अटक केली आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत नालासोपारा (पूर्व) परिसरात अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणाऱ्या परकीय नायजेरीयनचा कहर वाढला आहे. अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक अमर मराठे हे पथकासह नालासोपारा परिसरात गस्त करीत असताना प्रगतीनगर हायटेन्शन रोड, श्री. गुरु अपार्टमेंट जवळ, नालासोपारा (पूर्व) या ठिकाणी नायजेरीन इसम हा संशयास्पद स्थितीत उभा असल्याचे दिसून आले. त्यावेळी त्याला ताब्यात घेतले. त्याचे नाव इबे इबे ऊर्फ चिमा मोजेस (३७) असे सांगितले. त्या इसमाची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ १६० ग्रॅम वजनाचा ३२ लाख रुपये किमतीचा मॅफेड्रॉन अंमली पदार्थ सोबत असल्याचे आढळून आले. आरोपीविरुध्द तुळींज पोलीस ठाण्याते गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### यापूर्वी अमली पदार्थांचे गुन्हे

अटक केलेल्या आरोपीवर यापूर्वी मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीसाठी ठेवला असल्याबाबत विरार पोलीस ठाणे व तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून मुंबई शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील सायबर पोलीस ठाण्यात माहिती व तंत्रज्ञान अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पान क्र. 5 दि. 15/04/2023

# घरफोडी करणाऱ्या दोघांना अटक

## १० गुन्ह्यांची उकल; ३ लाख ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त



**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

वालीव पोलीस ठाणे हद्दीत चोरी, घरफोडी चोरी करणाऱ्या दोन आरोपींना वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक करून त्यांनी केलेले १० गुन्हे उघडकीस आणले असून त्यांच्याकडून ३ लाख ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत सतत दिवसा व रात्री चोरी व घरफोडी चोरींच्या गुन्हयांमध्ये वाढ झाली होती. याबाबत वरिष्ठांनी गुन्हे उघडकीस आणून व गुन्ह्यास आळा घालण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून दिवसा व रात्री गुन्हे घडलेल्या घटनास्थळावरून माहिती मिळवली. मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी भावेश महेश वेदक (२२) व बद्रीआलम अकलान चौधरी ऊर्फ पप्पू (३०) यांना ताब्यात घेवून तपास केला असता त्यांनी वालीव पोलीस ठाण्याचे हद्दीत १० गुन्हे केल्याचे उघडकीस आले. गुन्हा केल्याचे उघडकीस आल्यामुळे त्या दोघांना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी यांच्याकडुन सोन्याचे दागिने व इतर वस्तु असा ३ लाख ४२ हजारांचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे, पोनि राहुलकुमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण पथकाचे स. पोनि ज्ञानेश फडतरे, पोलीस हवालदार मुकेश पवार, मनोज मोरे व अन्य पथकाने केली.

# मुलीला वेश्याव्यवसायास परदेशात जाण्यास प्रवृत्त करणाऱ्या आई, भावाला अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर येथे राहणाऱ्या एका पीडित मुलीला वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त करणाऱ्या तिच्या आई व भावावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर व नवघर पोलीस ठाणे यांनी संयुक्तपणे कारवाई करून पीडित मुलीची सुटका केली आहे.

भाईंदर पूर्वेला राहणाऱ्या एका पिडीत मुलीला तिची आई व भाऊ हे तिच्या मनाविरुध्द बळजबरीने पैशासाठी वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडत आहेत. तसेच तिला तिच्या मनाविरुध्द परदेशात वेश्यागमनासाठी पाठविणार असून तिला मदतीची आवश्यकता असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना मिळाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदरचे पो. नि. समीर अहिरराव व पथक यांनी नवघर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुशिलकुमार शिंदे, पो. हवा. शशिकांत भोईर यांना मिळालेली माहिती सांगितली. तसेच त्यांना व संस्थेचे पदाधिकारी यांना बरोबर घेतले. माहिती मिळालेल्या ठिकाणी छापा टाकून कारवाई करून पीडित मुलीचा भाऊ व आई यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता पीडित मुलीला तिची आई व भाऊ हे आर्केस्ट्रा बारच्या नावाखाली दलालामार्फत बाहेर देशात पाठविणार आहे व त्याबदल्यात वेश्यागमनासाठी मोबदला म्हणून रोख रक्कम घेतल्याचे पोलिसांनी सांगितले.

### अनेकदा वेश्यागमनासाठी परदेशात पाठवले

यापूर्वी देखील मायलेकांनी त्या मुलीला अनेक वेळा वेश्यागमनासाठी परदेशात पाठवले होते. त्याचा मोबदला घेतला होता. आता देखील तिला वेश्यागमनासाठी परदेशात पाठवणार होते. त्या पिडीत मुलीने वेश्यागमनासाठी परदेशात जाण्यास नकार देत असल्यामुळे तिला मारहाण व शिवीगाळ केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पीडित मुलीची आई व भाऊ यांच्या विरुद्ध नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

दि.15/04/2023

लोकमत पान क्र.2

## हॉस्पिटल विरोधात गुन्हा दाखल

नालासोपारा : विरारमध्ये मेडिकल शॉपमध्ये अवैधरीत्या औषधांचा साठा व विक्री केल्याप्रकरणी हॉस्पिटल प्रशासनाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चंदनसार रोड येथे वेलक्युअर मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल आहे. या हॉस्पिटलच्या वेलक्युअर केमिस्ट शॉपमध्ये २८ फेब्रुवारीपासून अन्न व औषध प्रशासनाच्या निरीक्षक राजश्री शिंदे यांना कोणतीही परवानगी घेतली नसताना औषधाचा साठा व विक्री करत असल्याचे आढळून आले होते. हॉस्पिटल प्रशासनाविरोधात गुरुवारी विरार पोलिस ठाण्यात औषधी द्रव्य व सौंदर्य प्रशासन अधिनियम कलमाखाली गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महामार्गावर रेती चोरी पकडली



नालासोपारा : बुधवारी रात्री एकच्या सुमारास मुंबई-अहमदाबाद महामार्गावर खानिवडे टोलनाक्याच्या पुढे मुंबई वाहिनीवर एका हायवा ट्रकमध्ये रेती भरून ती विक्रीसाठी नेली जात असताना मांडवी पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत ट्रक व रेती असा दहा लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ट्रकचालक बाळाराम नथू गडग व हायवा ट्रकमालक भावेश बळीराम घरत या दोघांविरोधात गुरुवारी मांडवी पोलिस ठाण्यात पर्यावरण संरक्षण अधिनियम कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्यनगरी पू. पान क्र.1

## विरारमध्ये ट्रकखाली चिरडून एक ठार, २ जखमी



नालासोपारा : विरार पश्चिमेच्या ग्लोबल सिटी येथील नारंगी फाटक रस्त्यावर हायवा ट्रक उलटल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात ट्रकखाली चिरडून एकाचा मृत्यू झाला असून, २ जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

शुक्रवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास नारिंगी फाटकापासून ग्लोबल सिटीच्या दिशेने हा ट्रक जात होता. समोरून पिकअप येत असताना तिला साईड देण्यासाठी ट्रक बाजूला घेताना ट्रक दुचाकीवर उलटून झालेल्या अपघातात तिघे जखमी झाले. यातील एकाचा मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले. यात मृताचे नाव समजू शकले नसून अशोक शुक्ला, रमा शुक्ला हे जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच अर्नाळा पोलिसांनी स्थानिक नागरिक व अग्निशमन पथकाच्या जवानांच्या मदतीने परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरू केले. हा ट्रक मालाने भरलेला असल्याने तीन क्रेनच्या साहाय्याने बाजूला करण्यात आला.

## भाईंदरमध्ये लाखोंची घरफोडी

मीरा रोड : भाईंदर पश्चिमेच्या गीता पार्क इमारतीत राहणारे श्रीकृष्ण बटा हे १२ एप्रिल रोजी सायंकाळी क्रोमा येथे एसी खरेदी करण्यासाठी गेले असता, अज्ञात चोरट्यांनी घराचे टाळे तोडून १८९ ग्रॅम वजनाचे सोने, १७ हजारांची पाव किलो चांदी व ५० हजार रुपये रोख रक्कम चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पश्चिमेला राहणारे श्रीकृष्ण बटा हे डायमंड कंपनीत नोकरीला असून, ते नवीन एसी आणण्यासाठी आपल्या कुटुंबासह घरातून ८ वाजता क्रोमा येथे गेले होते.

ते पुन्हा ९ वाजता घरी आले असता, त्यांच्या घराच्या दरवाजाचे टाळे तोडून अज्ञात चोरट्यांनी घरातील कपाटाची तिजोरी तोडून कपाटातील सोन्याचे दागिने, पाव किलो चांदी व ५० हजार रुपये रोख असा एकूण १० लाख ६२ हजारांचा मुद्देमाल घरफोडी करून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील अधीक तपास भाईंदर पोलीस ठाण्याचे वपोनि. मुकुटलाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

Scanned with CamScanner

म.टा.पु. पान क्र.1

दि. 15/04/2023

# पुन्हा 'अनफिट' धाव

## मिरा-भाईंदरमध्ये कचरा वाहतुकीसाठी वैधता संपलेल्या वाहनांचा वापर

म. टा. वृत्तसेवा,मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरमध्ये वैधता संपलेल्या वाहनांचा वापर कचरा वाहतुकीसाठी केला जात असल्याने अपघाताच्या अनेक घटना घडल्या आहेत. अशा वाहनांवर मधल्या काळात कारवाईदेखील करण्यात आली होती. मात्र आता पुन्हा कचरा वाहतुकीसाठी अनेक अनफिट वाहनांचा वापर केला जात असल्याचे दिसत आहे. याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या संदर्भात एका सामाजिक संस्थेने पालिका आयुक्तांकडे तक्रार केली आहे.



मिरा-भाईंदर महापालिका हद्दीत दररोज सुमारे साडेचारशे ते पाचशे टन कचऱ्याची निर्मिती होत असते. हा कचरा गोळा करून, तो वाहनांच्या मदतीने उत्तन येथील कचरा प्रकल्पात प्रक्रिया करण्यासाठी टाकला जातो. त्यासाठी पालिकेने दोन विभागांमध्ये कंत्राटदाराची नियुक्ती केली असून त्याला दरमहा लाखो रुपयांचे देयक अदा केले जाते. या कामासाठी काही नवीन वाहने महापालिकेने उपलब्ध करून दिली आहेत. तर उर्वरित वाहने कंत्राटदार त्याची वापरत आहेत.

शहरात मागील काही दिवसांत कंत्राटदारांकडून वैधता संपलेल्या अनफिट कचरा गाड्यांचा वापर कचरा वाहतुकीसाठी केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. ही वाहने पूर्वी दुसऱ्या महापालिकेसाठी वापरली जात होती. त्यांचीच रंगरंगोटी करून ती आता मिरा-भाईंदरमध्ये वापरली जात असल्याचे सांगितले जाते. शहरात या वाहनांची संख्या अधिक आहे. त्यामुळे अपघात झाल्यास आवश्यक मदत मिळण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाला ही बाब दिसत नाही का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. या संदर्भात शिव समर्थ प्रतिष्ठान सामाजिक संस्थेने पालिका आयुक्त दिलीप ढोले, पोलिस आयुक्त मधुकर पांडे व प्रादेशिक परिवहन विभागाकडे तक्रार केली आहे. तसेच या प्रकरणी कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणीही केली आहे.

या संदर्भात माहितीसाठी पालिका उपायुक्त कल्पिता पिंपळे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

### याआधीही अपघात, कंत्राटदारावर कारवाई

यापूर्वीदेखील जुन्या कंत्राटदारांकडून वैधता संपलेल्या अनफिट वाहनांचा वापर केला जात होता. यामुळे उत्तन परिसरात अनेकदा अपघात घडले आहेत. या वाहनांवर स्थानिक काशिमिरा वाहतूक पोलिसांनीदेखील दंडात्मक कारवाई केली होती. तसेच कंत्रादराचे देयक अदा न करण्याची कारवाईही पालिकेने केली होती.

---

पुण्यनगरी पु. पान क्र. 4

# वसईच्या प्रांताधिकारीपदी शेखर घाडगे, तर तहसीलदारपदी अविनाश कोष्टी

। वसई । वसईचे प्रांताधिकारी स्वप्नील तांगडे आणि तहसीलदार उज्ज्वला भगत यांची एकाच दिवशी बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी नवे प्रांत अधिकारी म्हणून नागपूरचे शेखर घाडगे, तर तहसीलदार म्हणून अविनाश कोष्टी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गुरुवारी दोन्ही अधिकाऱ्यांनी आपला पदभार स्वीकारला आहे.

वसई तहसीलदार उज्ज्वला भगत यांनी त्यांचा अडीच वर्षांचा कार्यभार पूर्ण केला. तर उपविभागीय अधिकारी स्वप्नील तांगडे यांनी त्यांचा सव्वाचार वर्षांचा कार्यभार पूर्ण केला आहे. वसईचे नवीन तहसीलदार म्हणून हजर झालेले



अविनाश कोष्टी हे २००७ ते २००९ या कालावधीत वसईत पुरवठा विभागात नायब तहसीलदार म्हणून कार्यरत होते. त्यामुळे त्यांना वसईच्या सर्व प्रश्नांची जाण आहे. वसई नंतर त्यांची तहसीलदार म्हणून बढती झाली होती. त्यानंतर तहसीलदार म्हणून २०१४ ते २०१६ मध्ये शहापूर, २०१६ ते २०१९ कर्जत, २०१९ ते २०२३ पर्यंत घाटकोपर अतिक्रमण तहसीलदार म्हणून त्यांनी कारभार सांभाळला आहे. आता या दोन्ही नवीन अधिकाऱ्यांच्या पुढे वसई तालुक्यातून जाणारे विविध केंद्रीय प्रकल्पातील बाधित शेतकऱ्यांचे मोबदल्या बाबतचे प्रश्न व इतर प्रश्न, सरकारी जागेवर होणारे अतिक्रमण, गावागावांतील अवैध दगडखानी, बेकायदा चाललेला भराव, असे विषय व अनेक समस्यांवर काम करावे लागणार आहे. वसईतील नवनियुक्त उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी जनतेला न्याय देऊन त्यांच्या हितासाठी व सर्वांगीण विकासासाठी दोन्ही अधिकाऱ्यांनी काम करावे, अशी आशा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

Scanned with CamScanner

दि. 15/04/2023

पुण्यनगरी पृ. पान क्र.4

# वर्क फ्रॉम होमच्या नावाने होतेय फसवणूक : सावध रहा

## पोलिसांचे नागरिकांना आवाहन



। मीरा रोड : मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाच्या वतीने शहरातील नागरिकांनी वर्क फ्रॉम होमच्या नावाने होणाऱ्या फसवणुकीपासून सावधान राहण्याचे आवाहन केले आहे.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटच्या वापरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, त्याच प्रमाणामध्ये सायबर गुन्ह्यांची संख्याही वाढली आहे. सायबर गुन्हेगार लोकांना वेगवेगळ्या मार्गाने गंडा घालण्याचा प्रयत्न करतात. ज्यांना सायबर सुरक्षेबाबत कल्पना असते तें यामधून वाचतात. मात्र, बहुतांश लोक सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात सहज अडकले जातात. सध्या सोशल मीडियावर त्याला काही तासांमध्ये घर बसल्या काम करून पैसे कमवा, अशी जाहिरात करून लिंक पाठवण्यात येते. त्याद्वारे चॅट बॉक्स ओपन झाल्यानंतर वेबसाईटची लिंक पाठवून त्यात स्वतःच्या नावाची नोंदणी करण्यास सांगतात. सुरुवातीला पैसे पाठवून विश्वास संपादन करून कमिशनच्या नावाने पैसे पाठवण्यास सांगून फसवणूक करण्यात येते. तसेच वेगवेगळ्या टास्कमध्ये रिव्ह्यू करा, टॅग करा, लाईक्स करा, असे करून तुम्हाला १०,००० रुपये मिळतील. परंतु त्यासाठी तुम्हाला पॅकेज घेतल्यानंतर मोठ-मोठ्या रकमेचे आमिष दाखवून फसवणूक करण्यात येते. अशी फसवणूक टाळण्यासाठी नागरिकांनी सायबर गुन्हे कक्ष, मि.भा.व.वि. यांच्याकडून नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात आले आहे. त्यामध्ये सूचना दिल्या आहेत. अनोळखी नंबरवरून आलेल्या एसएमएस लिंकवर क्लिक करू नये. आपली गोपनीय माहिती वेबसाईटवर भरण्यापूर्वी त्या वेबसाईटचा यूआरएल काळजीपूर्वक तपासा. बँकेचा कार्ड तपशील, पीन, ओटीपी., पासवर्ड आदी वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती कोणासोबत शेअर करू नका. लिंकवर क्लिक करण्यापूर्वी आधी विचार करा. टेलिग्राममध्ये येणाऱ्या फसव्या लिंक्सवर क्लिक करू नये. नामांकित कंपन्यांमध्ये वर्क फ्रॉम होमद्वारे पैसे कमावण्याच्या आमिषाला बळी पडू नका. (ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, नोकरी, कॉम इ.) मीरा-भाईंदर, वसई-विरार शहरातील नागरिकांना सायबर गुन्हे कक्ष, मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे जाहीर आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे होणाऱ्या फसवणुकीबाबत सतर्क रहावे. तसेच अशा प्रकारे कोणत्याही व्यक्तीची फसवणूक झाल्यास तत्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यास सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www, cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाइनवर संपर्क साधून तक्रार देण्यात यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकसत्ता पान क्र.17


# वसई-विरारमध्ये पुन्हा करोना 'वॉर रूम'

## करोना बळीनंतर पालिका प्रशासन सावध

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

वसई : वसई-विरार शहरात करोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असून, शहरातील सक्रिय रुग्णांची संख्या ४० च्या वर गेली आहे. त्यातच शहरातील एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे वसई-विरार महापालिका प्रशासनाने खबरदारी म्हणून उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. वाढत्या करोना रुग्णांमुळे महापालिकेने करोना 'वॉर रूम' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

करोना रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन महापालिका आयुक्तांनी उपाययोजना करण्यासाठी तातडीने आढावा बैठक आयोजित केली होती. महापालिकेच्या सर्व रुग्णालयांचे प्रमुख वैद्यकीय अधीक्षक तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.



या वेळी करोनाच्या वाढत्या रुग्णांबाबत चिंता व्यक्त करून आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. करोना काळात कार्यरत असलेली 'वॉर रूम' पुन्हा सुरू करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिली.

करोनाशी लढण्यासाठी महापालिकेकडे पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ, औषधसाठा, प्राणवायू सुविधा आहे. करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिका प्रशासन सज्ज असल्याचे पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त अजिंक्य बगाडे, उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य), डॉ. विजयकुमार व्दासे, तसेच मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. भक्ती चौधरी उपस्थित होते.

### 'गर्दीत जाणे टाळा, मुखपट्टी वापरा'



सद्यस्थितीत वाढत्या करोना रुग्णांमुळे नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे, सामाजिक अंतर ठेवावे, वारंवार हात धुवावेत, मुखपट्टीचा वापर करावा, श्वास घेण्यास त्रास होत असल्यास त्वरित जवळील रुग्णालयास उपचार घ्यावेत. त्याचबरोबर सहव्याधी असणारे वृद्ध व्यक्ती आणि रुग्ण, गरोदर महिला यांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. त्याचबरोबर तापसदृश लक्षणे असणाऱ्या रुग्णांची आरटीपीसीआर चाचणी करण्याचेही निर्देश या बैठकीत देण्यात आले.

Scanned with CamScanner

# निर्जन स्थळांवरील वाढते धोके

शहरबात

सुहास बिऱ्हाडे

**निर्जन स्थळांवर फिरण्यासाठी गेलेल्या जोडप्यांमधील तरुणींवर बलात्काराच्या घटना वाढू लागल्या आहेत. विरार, नवी मुंबई, डोंबिवली येथे मागील चार महिन्यांत तीन तरुणींवर बलात्कार आणि सामूहिक बलात्काराच्या घटना घडल्या आहेत. पोलीस असल्याची बतावणी करून, धमकावून बलात्कार केले जात आहेत. शक्ती मिल सामूहिक बलात्काराच्या घटनेनंतरही बोध घेतलेला दिसून येत नाही.**



## बंदोबस्त ठेवण्याची गरज

राकेश मारिया मुंबईचे पोलीस आयुक्त असताना त्यांनी निर्जन स्थळांवर पोलीस बंदोबस्त ठेवला होता. पोलिसांनी 'नैतिक पोलीसगिरी' न करता अशा ठिकाणी अप्रिय घटना टाळण्यासाठी बंदोबस्त ठेवावा, असे आदेश काढले होते. पालकांनीही आपल्या मुलांना अशा घटनांबाबत माहिती देऊन सावध करायला हवे.

## पोलिसांचा आधार वाटायला हवा

पोलिसांशी ११२ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधल्यास पाच मिनिटांत पोलीस पोहोचू शकतात. त्यामुळे संकटकाळी असा हेल्पलाइनचा नंबर माहिती असायला हवा. जवळच्या व्यक्तींना, मित्रांना आपण कुठे जात आहोत त्याची माहिती असणे आवश्यक आहे. म्हणजे किमान संकटकाळी ते पोहोचू शकतात. पोलिसांनीही निर्जन स्थळांची यादी तयार करून तेथे नियमित गस्त घालणे गरजेचे आहे. अल्पवयीन जोडप्यांना पोलिसांची भीती न वाटता आधार वाटला हवा.

**विरारमध्ये राहणारे** तरुण-तरुणी २२ मार्च २०२३ रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास विरार पूर्वेकडील साईनाथनगर येथील पाच पायरीच्या जंगलात फिरण्यास गेले होते. हा परिसर निर्जन आहे. ते दोघेही तिथे बसले असताना त्यांना राजेश सोनी आणि यश शिंदे या तरुणांनी हटकले. या दोघांनी त्यांना त्यांचे फोटो काढून धमकावले. त्यानंतर प्रियकराला मारहाण करत त्याच्या समोरच तरुणीवर दोघांनी बलात्कार केला. तब्बल दीड तास हा प्रकार सुरू होता. आरोपींनी तरुणाचे कपडे काढून त्याला नग्नावस्थेत सोडून दिले होते. विरार पोलिसांनी नंतर दोन्ही आरोपींना अटक केली. परंतु, त्या पीडित तरुणीसाठी हा आयुष्यातील काळा दिवस ठरला.

२०१९ मध्येही अशीच सामूहिक बलात्काराची घटना घडली होती. १५ एप्रिल २०१९ रोजी विरारमधील नववीत शिकणाऱ्या १५ वर्षांच्या मुलीवर तिच्याच मित्रासमोर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. जीवदानी रोड येथील भास्कर वामन ठाकूर शाळेच्या मागील निर्जन जागेत ती मित्रासोबत असताना दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना हटकले. तिच्या मित्राला त्यांनी मारहाण केली आणि त्यांना तेथील निर्जन जागेत नेले. यानंतर त्यांनी मित्रासमोर मुलीवर बलात्कार केला होता. या प्रकरणातील एक आरोपी रिक्षाचालक होता.

निर्जन ठिकाणी तरुण-तरुणी फिरण्यासाठी जातात. परंतु, या जागा धोकादायक असतात हे वारंवार सिद्ध होत आहे. १४ डिसेंबर २०२२ रोजी नवी मुंबईतील नेरुळ येथील बालाजी मंदिराजवळील निर्जन जागेत एक अल्पवयीन मुलगी आपल्या प्रियकरासोबत गेली होती. तेथे एका व्यक्तीने त्यांना पोलीस असल्याचे सांगून हटकले आणि मुलीवर बलात्कार केला. पोलिसांनी नंतर ५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे चित्रीकरण तपासले. तसेच २० संशयितांची चौकशी केल्यानंतर बलात्कार करणाऱ्या संतोष नरवडे याला अटक केली. तळोजा पोलीस ठाण्यातून त्याला २०१७ मध्ये बडतर्फ केले होते. तेव्हापासून तो निर्जन जागेत शिकार शोधण्यासाठी फिरायचा. जोडप्यांना धमकावून मुलींवर बलात्कार करत होता.

अशीच घटना २८ जानेवारी २०२३ रोजी डोंबिवलीजवळील ठाकुर्ली येथे घडली. तेथे पश्चिमेला रेल्वे स्थानकाजवळील गर्द झाडीत १७ वर्षांच्या मुलीवर पोलीस असल्याची बतावणी करून २५ ते ३० वयोगटातील दोन तरुणांनी बलात्कार केला होता. अल्पवयीन मुलगी आणि तिचा मित्र या निर्जन जागेत फिरण्यासाठी आले होते. त्यावेळी या दोघांनी 'आम्ही पोलीस आहोत. तुमची चौकशी करायची आहे,' अशी बतावणी करून तरुणी आणि तिच्या मित्राला खाडी किनारीच्या झुडपांमध्ये निर्जन स्थळी नेले. ते खरच पोलीस असल्याचे वाटल्याने तरुणी आणि मित्र घाबरले होते. निर्जन स्थळी जाताच तोतया पोलिसांमधील एकाने तरुणीवर लैंगिक अत्याचार केले. शारीरिक संबंधाचे हे चित्रीकरण दुसऱ्या तोतया पोलिसाने आपल्या मोबाइलमध्ये चित्रित केले. घडलेला प्रकार कोणाला सांगितल्यास समाजमाध्यमांवर बदनामी करण्याची धमकीही त्यांनी दिली होती.

नवी मुंबई, डोंबिवली आणि विरारमध्ये लागोपाठ घडलेल्या या घटना धोक्याच्या सूचना देणाऱ्या आहेत. मुंबईच्या लोअर परळ येथे छायाचित्रकार तरुणीवर झालेल्या सामूहिक बलात्काराच्या घटनेने देश हादरला होता. दुर्दैवाने त्या तुलनेत मुंबईलगतच्या शहरातील या घटनांची फारशी चर्चा झाली नाही. पण निर्जन जागा या धोकादायक ठरत असल्याचे पुन्हा सिद्ध झाले आहे.

**निर्जन स्थळांवरील धोके कसे रोखायचे?**

तरुण-तरुणी एकांतच्या शोधात निर्जन ठिकाणी जातात. परंतु, अनेकदा अशा अनोळखी जागा संकटांना आमंत्रण देणाऱ्या ठरतात. ऑंबटशौकीन, मद्यपी, नशेबाज आणि गुंड प्रवृत्तीचे लोक अशा स्थळांवर सावज शोधत असतात. अनेक तरुण-तरुणी अल्पवयीन असतात. ते घरी न सांगता तेथे आलेली असतात. कुणी हटकले तर त्यांना भीती वाटते. सर्वात जास्त भीती घरी कळेल, याची असते. समोरच्या व्यक्तीने पोलीस असल्याची बतावणी केली तर ते अधिक घाबरतात. मुळात जोडप्यांना हटकण्याचा अधिकार म्हणजे 'नैतिक पोलिसगिरी' करण्याचा अधिकार हा कुणालाच नसतो. अगदी पोलिसांनाही नाही. सार्वजनिक ठिकाणी एखादे जोडपे अश्लील कृत्य करत असेल, तर फक्त पोलिसांना मुंबई पोलीस कायदा ११० नुसार कारवाईचा अधिकार आहे. त्यात फक्त १२०० रुपयांचा दंड आहे. पोलिसांनी कारावई केल्यास तात्काळ १२०० रुपये दंड भरून (टेबल बेल) सुटका होते. अटक होत नाही. अशा जोडप्यांचा घरी सांगण्याचा पोलिसांना अधिकार नसतो. असे कपडे का घातले? इथे काय करताय? वगैरे उपदेशाचे डोस पाजण्याचा पोलिसांना नैतिक अधिकार नसतो. पण पोलिसांचे नाव घेऊन अनेक गुंड प्रवृत्तीचे लोक जोडप्यांना घाबरवतात. नवी मुंबई आणि डोंबिवलीच्या प्रकरणात तोतया पोलिसांनीच धमकावून बलात्कार केला होता. हे वाढते प्रकार रोखायचे असतील तर निर्जन स्थळी न जाणे हा सर्वोत्तम उपाय आहे. मुलींसोबत असलेला प्रियकर हा 'सुपर हिरो' नसतो, की तो एकाच वेळी १० जणांना जमिनीवर लोळवू शकतो. त्यामुळे निर्जन स्थळावर गेल्यास चार ते पाच गुंड आले तर काय होईल? याचा विचार करावा.

Scanned with CamScanner

दैनिक
# आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.

वर्ष : १२ | अंक. ०२६ | गुरुवार १३ एप्रिल २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०८


# MBVV सायबर क्राईम सेलचे नागरिकांना आवाहन, असे करू नका

**वसई.** आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटचा वापर खूप वेगाने वाढला आहे आणि त्याच प्रमाणात सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढले आहे. सायबर गुन्हेगार वेगवेगळ्या मार्गांनी लोकांना फसवण्याचा प्रयत्न करतात. ज्याला सायबर सुरक्षेबद्दल माहिती आहे त्यांनी जरूर वाचावे. परंतु बहुतेक लोक सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात सहज अडकतात. सध्या घरी बसून त्यांना सोशल मीडियावर काही तासांत घरबसल्या काम करून पैसे कमवण्याची लिंक पाठवली जाते. त्याद्वारे वेबसाइटची लिंक उघडली जाते. त्यामध्ये तुमचे नाव नोंदवण्यास सांगून, सुरुवातीला पैसे पाठवून तुमची फसवणूक केली जाते, विश्वास संपादन केल्यानंतर कमिशनच्या नावाने पैसे पाठवण्याबरोबरच विविध कामांचे पुनरावलोकन, टॅगिंग, लाईक करून तुम्हाला रु. १०,०००/- मिळतील. मात्र त्यासाठी पॅकेज घेतल्यानंतर मोठ्या रकमेचे आमिष दाखवून तुमची फसवणूक केली जाते. सायबर क्राईम सेलने नागरिकांना आवाहन केले आहे की, (१) अनोळखी क्रमांकावरून आलेल्या एसए [illegible] करू नका. (२) माहिती भरण्यापूर्वी . कृपया वेबसाइटची URL तपासा. (३) ने देखरेख केली आहे. बँक कार्ड तपशील, पिन, ओटीपी, पासवर्ड इत्यादी वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती कोणाशीही शेअर करू नका.(४).कोणत्याही लिंकवर क्लिक करण्यापूर्वी विचार करा.(५ .टेलिग्राममधील फसव्या लिंक्सवर क्लिक करू नका.(६).नामांकित कंपन्यांमध्ये घरून काम करून आमिष दाखवू नका. (Amazon, Flipkart, Job.com F.) तथापि, सायबर क्राईम सेल, मीरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने मीरा-भाईदर, वसई-विरार येथील नागरिकांना अशा फसवणुकीपासून सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अशी कोणतीही ओळख फसवणूक झाल्यास, ताबडतोब जवळच्या पोलीस स्टेशन, सायबर क्राईम सेलशी संपर्क साधा. तसेच www.cybercrime.gov.in किंवा १९३० या हेल्पलाइनवर संपर्क साधा आणि तक्रार नोंदवा.

PhotoGrid

Scanned with CamScanner

लोकमत

# विरारमध्ये हायवा ट्रक उलटून महिलेचा मृत्यू, दोघे जखमी

## गुन्हा दाखल : पती-पत्नी रुग्णालयात, प्रकृती गंभीर

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरार येथे हायवा ट्रक उलटून त्याखाली येऊन एका महिलेचा मृत्यू तर दोघे जखमी झाले आहेत. जखमी व्यक्ती हे पती-पत्नी असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती गंभीर आहे.

विरारच्या ग्लोबल सिटी येथील नारंगी फाटा येथे सकाळी साडेदहाच्या सुमारास हा अपघात झाला. रेतीने भरलेला हायवा ट्रक रस्त्याने चालला असताना विरुद्ध दिशेने पीकअप गाडी आली. यामुळे ट्रक रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात पलटी झाला. यावेळी मोटारसायकलने जाणारे दोन जण गाडीखाली आले. सुचिता सुजीत शेलार (वय ३५) या महिलेचा त्यात जागीच मृत्यू झाला आहे, तर अशोक शुक्ला आणि त्यांच्या पत्नी रमा शुक्ला हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना जवळच्या संजीवनी रुग्णालयात दाखल करण्यात आले.



वसई-विरार अग्निशमन दलाचे पथकासह अर्नाळा सागरी पोलिस ठाण्याचे अधिकारी-कर्मचारी अपघातस्थळी मदतकार्य करताना.

वसई-विरार अग्निशमन दलाचे पथक, अर्नाळा सागरी पोलिस ठाण्याचे अधिकारी-कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. तीन क्रेन आणि जेसीबीच्या साहाय्याने हायवा गाडी बाहेर काढली गेली. ट्रक चालकाविरोधात अर्नाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती अर्नाळा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कल्याणराव कर्पे यांनी दिली आहे.



Scanned with CamScanner

लोकमत

# चोरी, घरफोडी करणाऱ्या दोघांना केली अटक

## १० गुन्ह्यांची उकल : मुद्देमाल हस्तगत

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : चोरी, घरफोडी करणाऱ्या दुकलीला वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलिसांनी पकडले आहे. या दोन्ही आरोपींकडून १० गुन्ह्यांची उकल करून लाखोंचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी शुक्रवारी दिली आहे.

वालीव पोलिस ठाणे चोरी व घरफोडी होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. याबाबत वरिष्ठांनी गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सूचना दिल्या होते. त्याअनुषंगाने वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार, तांत्रिक विश्लेषण व गुन्हे घडलेल्या घटनास्थळावरून प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी भावेश महेश वेदक (२२) आणि बद्रीआलम अकलाख चौधरी ऊर्फ पप्पू (३०) या दोघांना ७ एप्रिलला ताब्यात घेऊन तपास केला. त्या दोघांनी वालीव पोलिस ठाण्याच्या हद्दीत १० गुन्हे केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे. दोन्ही आरोपींकडून दागिने व इतर वस्तू असा एकूण ३ लाख ४२ हजाराचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

### या पथकाने केली अटकेची कारवाई

ही अटकेची कामगिरी पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रृंगी आणि सहायक पोलिस आयुक्त चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वालीव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कैलास बर्वे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश फडतरे, पोलिस हवालदार मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद फड, सतीश गांगुर्डे, बाळू कुटे, गजानन गरिबे, अभिजित गढरी यांनी केली आहे.



Scanned with CamScanner

लोकमत

# ३२ लाखांचे मेफेड्रोन पकडले

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नालासोपाऱ्यात पुन्हा एकदा ३२ लाखांचे १६० ग्रॅम वजनाचे एमडी सापडल्याने खळबळ उडाली आहे. अंमली विरोधी पथकाच्या पोलिसांनी मंगळवारी एका नायजेरियन आरोपीला पकडून लाखो रुपये किमतीचे मेफेड्रोन हे अंमली पदार्थ जप्त केले आहे. तुळींज पोलिस ठाण्यात आरोपीवर गुन्हा दाखल करून मुद्देमाल जप्त केला आहे.

नालासोपारा (पूर्व) येथे मंगळवारी अंमली पदार्थविरोधी पथकाचे पोलिस निरीक्षक अमर मराठे व त्यांचे सहकारी गस्त घालत होते. प्रगतीनगरच्या हायटेन्शन रोडवरील श्री गुरुदेव अपार्टमेंटजवळ एक नायजेरियन इसम संशयास्पद स्थितीत उभा होता. त्याने पोलिस हवालदार टक्के आणि यादव यांना धक्काबुक्की करून पळून जाण्याचा प्रयत्न करतानाच त्याला पथकाने ताब्यात घेतले. त्याचे नाव इबे इबे उर्फ चिमा मोजेस (३७) असे आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 15, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-300 मुंबई, शनिवार 15 अप्रैल 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# ड्रग्स के साथ नाईजीरियन गिरफ्तार

**नालासोपारा :** नालासोपारा पूर्व के प्रगति नगर इलाके में फिर एंटी-नारकोटिक्स सेल की टीम ने एक नाईजीरियन पर कार्रवाई की है और उसके पास से 32 लाख रुपये का ड्रग्स की खेप जप्त की है।यह कार्रवाई डीसीपी (क्राइम) अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में एंटी-नारकोटिक्स सेल के पुलिस निरीक्षक अमर मराठे व स.पो.नि. अमोल आंबवणे की टीम ने की है। पुलिस के मुताबिक,मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस कमिश्नरेट के तहत नालासोपारा (पूर्व) क्षेत्र में ड्रग्स का कारोबार करने वाले विदेशी नाइजीरियाई लोगों के खिलाफ सूचना मिलने के बाद वरिष्ठों ने कार्रवाई के आदेश दिए थे,तदनुसार 12 अप्रैल



को एंटी नारकोटिक्स सेल के प्रभारी पुलिस निरीक्षक अमर मराठे व स्टाफ नालासोपारा इलाके में पेट्रोलिंग करते हुए प्रगतिनगर हाई टेंशन रोड, श्री. गुरु अपार्टमेंट के पास सड़क के साथ नालासोपारा (पूर्व) स्थित पहुँचे,तभी एक नाईजीरियन शख्स को हिरासत में लेने की कोशिश की गयी तो नाईजीरियन ने पो.हवा.टक्के व पो.कर्मचारी यादव का प्रतिरोध कर धक्कामुक्की कर भागने की कोशिश की,तो पुलिस टीम ने उसे धर दबोचा लिया, पुलिस ने उसका नाम इबे इवे ऊर्फ चिमा मोजेस (37) बताया है।पुलिस ने कहा कि आरोपी की तलाशी के दौरान 32,00,000 रुपये का 160 ग्राम मॅफेड्रॉन (एमडी) ड्रग्स जप्त किया गया। पुलिस के मुताबिक,उक्त आरोपी की गिरफ्तारी से पहले विरार,तुलिंज थाने में बिक्री के लिए मॅफेड्रॉन रखने का मामला दर्ज है व मुंबई शहर पुलिस आयुक्तालय के अधिकार क्षेत्र के साइबर पुलिस स्टेशन में सूचना और प्रौद्योगिकी अधिनियम के तहत मामला दर्ज किया गया है। नाईजीरियन के ऊपर एनडीपीएस एक्ट व कलम 353,323 के तहत केस दर्ज करवाया गया है।

Scanned with CamScanner

३४ वर्षांच्या अखंड पत्रकारितेची परंपरा...

दैनिक नरवीर चिमाजी

वर्ष : ३५ | अंक : २४७ | शनिवार दि. १५ एप्रिल २०२३ | पाने : ४ | किंमत २ रुपये

# घरफोडी व चोरी करणारे दोन सराईत गजाआड; १० गुन्ह्यांची उकल

वसई : वार्ताहर

वालीव पोलीस ठाणे हद्दीत सतत दिवसा व रात्री चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाली होती. याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेऊन गुन्हे उघडकीस आणणे आणि त्याला पायबंद घालण्यासाठी सूचना केल्या होत्या. वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रगतीकरण पथकाच्या पोलिसांनी गुप्त बातमीदार, तांत्रिक विश्लेषण व घटनास्थळावरून मिळवलेल्या माहितीच्या आधारे आरोपी भावेश महेश वेदक (वय २२) रा. चिंचपाडा, वालीव आणि बद्रीआलम अखलाख चौधरी उर्फ पप्पू या दोघांना ताब्यात घेऊन त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी वालीव



पोलीस ठाणे हद्दीत १० गुन्हे केल्याचे कबूल केले. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून सोन्याचे दागिने व इतर वस्तू असा एकूण ३ लाख ४२ हजार रुपये किमतीचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत ...पान ४ वर

## घरफोडी व चोरी करणारे दोन सराईत ...

करण्यात आला आहे. त्यांनी केलेले १० गुन्हे हे वालीव हद्दीतील असून याच वर्षातील आहेत. वरील कामगिरी पोलीस उपआयुक्त परि-२ वसई च्या श्रीम. पौर्णिमा चौगुले- श्रींगी, तुळींज विभागाचे सहा. पोलीस आयुक्त चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक ज्ञानेश फडतरे, पोहवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, संतोष गांगुर्डे, बाळू कुटे, पोअं. गजानन गरीबे, अभिजीत गढरी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner